निर्वाह भत्याचे पुर्नविलोकन करणे बाबत.
श्री. जाधव संतोष बाळासाहेब, सेवा निलंबीत कनिष्ठ सहाय्यक, जि.प.सा.बा दक्षिण विभाग अहिल्यानगर

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/५५२३/२४०/२०२५
अहिल्यानगर दिनांक ०३/०३/२०२५

वाचा:-.१ इकडील निलंबन आदेश क्र.साप्रवि/आस्था-३/५५२३/१६०७/२०२३ दि १८/१२/२०२३
२. इकडील दोषारोप पत्र क्र.साप्रवि/आस्था-३/९३७/२०२४ दि १३/११/२०२४
३. उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि.प.लपा. विभाग जामखेड यांचेकडील पत्र क्र.लपा/आस्था ५२३/२०२४ दिनांक १६/१२/२०२४ समवेत दोषारोप पत्र बजावले बाबत श्री जाधव यांची पोहोच
४. उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि.प.लपा. विभाग जामखेड यांचेकडील पत्र क्र.लपा/आस्था ४७/२०२५ दिनांक ०३/०२/२०२५ समवेत श्री जाधव यांनी सादर केलेला दोषारोपपत्राचा खुलासा
५. महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील आदेश दिनांक १० डिसेंबर १९८१
६. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ नियम ६१ (१)

श्री जाधव संतोष बाळासाहेब, सेवा निलंबीत कनिष्ठ सहाय्यक हे जि.प.सा.बा दक्षिण विभाग, अहिल्यानगर येथे कार्यरत असताना बांधकाम विभागाकडील कामकाजात अनियमितता करुन जिल्हा परिषदेची प्रतिमा मलिन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेने संदर्भ क्रमांक १ अन्वये त्यांना जिल्हा परिषद सेवेतुन सेवा निलंबीत करणेत आले होते.

श्री जाधव संतोष बाळासाहेब, सेवा निलंबीत कनिष्ठ सहाय्यक हे जि.प.सा.बा दक्षिण विभाग, अहिल्यानगर यांना दिनांक ०१/१२/२०२३ पासुन सेवानिलंबन करणेत आलेले असुन सदर कालावधी हा तीन महिन्यापेक्षा जास्त झालेला आहे.

श्री जाधव संतोष बाळासाहेब, यांना सेवा निलंबीत कालावधीमध्ये पहिल्या तीन महिन्यासाठी उक्त संदर्भ क्रमांक ५ मधील नियमानुसार निलंबन भत्ता अदा करणेत आलेला आहे. संदर्भ क्रमांक ३ नुसार श्री जाधव यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करणेत आलेली आहे.

श्री जाधव संतोष बाळासाहेब, सेवा निलंबीत कनिष्ठ सहाय्यक, हे त्यांच्या सेवा निलंबन कालावधी वाढविणेस जबाबदार नसलेचे निष्पन्न होत आहे. सबब, मी. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर संदर्भ क्रमांक ५ च्या तरतुदीस अधिन राहुन मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन श्री जाधव संतोष बाळासाहेब, सेवा निलंबीत कनिष्ठ सहाय्यक, यांना सेवा निलंबित केल्यानंतर पहिल्या तीन महिन्याचे कालावधीमध्ये देण्यात आलेला निर्वाह भत्याच्या ५० टक्के वाढ इतक्या मर्यादेपर्यंत तीन महिन्याचे कालावधीनंतर निर्वाह भत्ता वाढविण्यास मंजुरी देत आहे. तसेच संदर्भ क्रमांक १ अन्वये श्री जाधव संतोष बाळासाहेब, सेवा निलंबीत कनिष्ठ सहाय्यक, यांना देण्यात आलेल्या आदेशामधील अटी व शर्तीचे काटेकोर पालन करणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.

सदर आदेशाची नोंद श्री जाधव संतोष बाळासाहेब, सेवा निलंबीत कनिष्ठ सहाय्यक, यांचे मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी व तसा अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश हा अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक **202503030400030** असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 19-03-2025 15:07:55
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति

श्री जाधव संतोष बाळासाहेब, सेवा निलंबीत कनिष्ठ सहाय्यक,
द्वारा:- उप अभियंता, जि.प. लपा उपविभाग जामखेड

प्रत:- उप अभियंता, जि.प. लपा उपविभाग जामखेड

२/- सदरचा आदेश श्री जाधव संतोष बाळासाहेब, सेवा निलंबीत कनिष्ठ सहाय्यक यांना बजावणेत येवून दिनाकिंत स्वाक्षरी घेतलेली प्रत या कार्यालयास विनाविलंब सादर करणेत यावी. तसेच सदर आदेशानुसार कार्यवाही होऊन संबंधिताच्या मुळ सेवापुस्तकात नोंद घेणेत येऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत:- कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बा दक्षिण विभाग अहिल्यानगर

प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:- निवड नस्ती

स्वाक्षरीत /---
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर